जाहीर

## प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

- एक वर्षाचे विमा संरक्षण असणारी ही एक अपघात विमा योजना आहे. दर वर्षी नूतनीकरण आवश्यक. बँका व सार्वजनिक क्षेत्रातील इन्शुरन्स कंपन्या यांच्या सहयोगाने या योजनेच परिचालन केले जाईल.
- १८ ते ७० वयोगटातील सर्व बचत बँक खातेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतील. एकाच व्यक्तीची अनेक बचत खाती असतील तर अशी व्यक्ती कुठल्याही एका बचत खात्याद्वारे हा विमा उतरवू शकेल. विमा उतरविणाऱ्या व्यक्तीचा आधार क्रमांक पायाभूत मानला जाईल.
- योजनेचा कालावधी दर वर्षी १ जून ते ३१ मे असा राहील व विमा हप्ता बँक खात्यात परस्पर नावे टाकला जाईल. पुढील वर्षाच्या नूतनीकरणाचा अर्ज ३१ मे पर्यंत देणे आवश्यक राहील.
- **अपघात विमा भरपाई पुढील प्रमाणे मिळेल.**

| | |
|---|---|
| मृत्यू | रु. २ लाख |
| दोन्ही डोळ्यांची संपूर्ण आणि बरी न होणारी हानी / दोन्ही हात किंवा दोन्ही पाय निकामी होणे / एक डोळा आणि एक हात किंवा एक पाय निकामी होणे | रु. २ लाख |
| एका डोळ्याची संपूर्ण आणि बरी न होणारी हानी किंवा एक हात किंवा एक पाय निकामी होणे | रु. १ लाख |

- विमा हप्ता रु. १२/- प्रती व्यक्ती प्रती वर्ष राहील व बँक बचत खात्यात परस्पर नावे टाकला जाईल.
- विमा धारकाने वय वर्षे ७० पूर्ण केल्यावर / बँकेच्या बचत खात्यात विमा हप्ता नावे टाकण्यास पुरेशी शिल्लक नसेल तर / बँक खाते बंद केले तर विमा संरक्षण संपुष्टात येईल.
- तांत्रिक अडचणीमुळे संपुष्टात आलेली विमा पॉलिसी काही अटींची पूर्तता केल्यानंतर पुन्हा चालू करता येईल.

प्रधानमंत्री जन-धन योजना

बँक ऑफ इंडिया
बैंक ऑफ इंडिया
Bank of India
BOI

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना

- एक वर्षाचे विमा संरक्षण असणारी ही एक आयुर्विमा योजना आहे. दर वर्षी नुतनीकरण आवश्यक. बँक ऑफ इंडिया व स्टार युनियन दाईची यांच्या सहयोगाने या योजनेचे परिचालन केले जाईल.
- १८ ते ५० वयोगटातील सर्व बचत बँक खातेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतील. एकाच व्यक्तीची अनेक बचत खाती असतील तर अशी व्यक्ती कुठल्याही एका बचत खात्याद्वारे हा विमा उतरवू शकेल. विमा उतरविणाऱ्या, व्यक्तीचा आधार क्रमांक पायाभूत मानला जाईल.
- योजनेचा कालावधी दर वर्षी १ जून ते ३१ मे असा राहील व विमा हप्ता बँक खात्यात परस्पर नावे टाकला जाईल. पुढील वर्षाच्या नूतनीकरणाचा अर्ज ३१ मे पर्यंत देणे आवश्यक राहील.
- विमाधारक योजनेत सहभागी झाल्यानंतर ४५ दिवसानंतर विमाधारकाचा कुठल्याही कारणाने मृत्यू झाला तर वारसास रु. २ लाख भरपाई मिळेल.
- विमा हप्ता रु. ३३०/- प्रती व्यक्ती प्रती वर्ष राहील व बँक बचत खात्यात परस्पर नावे टाकला जाईल.
- विमा धारकाने वय वर्षे ५५ पूर्ण केल्यावर / बँकेच्या बचत खात्यात विमा हप्ता नावे टाकण्यास पुरेशी शिल्लक नसेल तर / बँक खाते बंद केले तर विमा संरक्षण संपुष्टात येईल.
- तांत्रिक अडचणीमुळे संपुष्टात आलेली विमा पॉलिसी काही अटींची पूर्तता केल्यावर पुन्हा चालू करता येईल.

Scanned by CamScanner

शरवांकडील मंजूर व वाटप नाहीत अशी 929 प्रकरणे त्वरीत

(महाराष्ट्र ...
जि. टी. हॉस्पिटल कंपाऊंड, बि. टी. मार्ग, जे.जे. स्कुल
टर्मिनसच्या जवळ, मुंबई-४०० ००१. दुरध्वनी क्र. (०२२

# अटल पेन्शन योजना

- अटल पेन्शन योजना ही निवृत्तीनंतर दरमहा ठराविक परतावा देणारी एक सरकारी पेन्शन योजना आहे. ही योजना मुख्यत: असंघटित क्षेत्रातील नागरिकांसाठी, ज्यांच्यासाठी कुठलीही पेन्शन योजना उपलब्ध नाही, अशांसाठी लाभदायक आहे. बँका व पेन्शन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण यांच्या सहयोगाने या योजनेचे परिचालन केले जाईल.

- १८ ते ४० वयोगटातील सर्व भारतीय बचत बँक खातेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतील.

- १८ वर्षे वयाच्या व्यक्तीने दरमहा रु. ४२/- भरले तर अशा व्यक्तीला वयाच्या ६० वर्षे पूर्ण झाल्यावर रु. १,०००/- पेन्शन दरमहा मिळू शकते. या प्रकारे जर दरमहा रु. २१०/- भरले तर रु. ५,०००/- पेन्शन दरमहा मिळू शकते. दर महिन्याचे योगदान बचत खात्यातून परस्पर नावे टाकण्याची सोय आहे.

- ग्राहकाचा काही कारणाने मृत्यू झाल्यास त्याच्या / तिच्या पत्नीस / पतीस हे पेन्शन चालू राहील. दोघांचाही मृत्यू झाल्यास त्यांनी नामांकित केलेल्या व्यक्तीस सर्व जमा रक्कम एक रकमी अथवा एकत्रित सूचक निधी परत करण्यात येईल.

- या योजने अंतर्गत ग्राहकाच्या सहभागाचा सूचक तक्ता सोबत दिला आहे.

| Age of Entr | Years of Contri. | Monthly Pension of Rs. 1000 | Monthly Pension of Rs. 2000 | Monthly Pension of Rs. 3000 | Monthly Pension of Rs. 4000 | Monthly Pension of Rs 5000 |
|---|---|---|---|---|---|---|
| 18 | 42 | 42 | 84 | 126 | 168 | 210 |
| 19 | 41 | 46 | 92 | 138 | 183 | 228 |
| 20 | 40 | 50 | 100 | 150 | 198 | 248 |
| 21 | 39 | 54 | 108 | 162 | 215 | 269 |
| 22 | 38 | 59 | 117 | 177 | 234 | 292 |
| 23 | 37 | 64 | 127 | 192 | 254 | 318 |
| 24 | 36 | 70 | 139 | 208 | 277 | 346 |
| 25 | 35 | 76 | 151 | 226 | 301 | 376 |
| 26 | 34 | 82 | 164 | 246 | 237 | 409 |
| 27 | 33 | 90 | 178 | 268 | 356 | 446 |
| 28 | 32 | 97 | 194 | 292 | 388 | 485 |
| 29 | 31 | 106 | 212 | 318 | 423 | 529 |
| 30 | 30 | 116 | 231 | 347 | 462 | 577 |
| 31 | 29 | 126 | 252 | 379 | 504 | 630 |
| 32 | 28 | 138 | 276 | 414 | 551 | 689 |
| 33 | 27 | 151 | 302 | 453 | 602 | 752 |
| 34 | 26 | 165 | 330 | 495 | 659 | 824 |
| 35 | 25 | 181 | 362 | 543 | 722 | 902 |
| 36 | 24 | 198 | 396 | 594 | 792 | 990 |
| 37 | 23 | 218 | 436 | 654 | 870 | 1,087 |
| 38 | 22 | 240 | 480 | 720 | 957 | 1,196 |
| 39 | 21 | 264 | 528 | 792 | 1,054 | 1,318 |
| 40 | 20 | 291 | 582 | 873 | 1,164 | 1,454 |
| एकत्रित सूचक निधी रुपये | | 1,70,000 | 3,40,000 | 5,10,000 | 6,80,000 | 8,50,000 |

Scanned by CamScanner